भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ६८८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०६/१०/२०१७

**१) अल्पवयीन मुलीला पळवुन नेल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक ०४/१०/२०१७ चे १०.३० वाजता दरम्यान यातील बालकल्याण समीती भंडारा च्या वतीने अल्पवयीन मुलीला कोणीतरी अज्ञात इसमाने पळवुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३६३ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. रेवतकर पो.स्टे साकोली हे करीत आहेत..

**२) अल्पवयीन मुलीला फुस लावुन पळवुन नेल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक ०५/१०/२०१७ चे ०२.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी ची अल्वयीन मुलगी ही रात्री फिर्यादी सोबत झोपुली असता व ती बाथरुम ला गेली असता परत आली नाही तरी यातील आरोपी याने मुलीला आमीष दाखवुन फुस लावुन पळवुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३६३ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सरोदे पो.स्टे तुमसर हे करीत आहेत.

**३) जेसीबी चालकाने एसटी बसला धडक मारुन एसटी बसचे नुकसान केल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक ०५/१०/२०१७ चे ०७.४५ वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील पिवळया रंगाची जेसीबी ही दारु पिवुन दारु च्या नशेत लापरवाहीने व निष्काळजीपणे चालवुन एसटीबस ला ड्रायव्हर साईडच्या मागे धडक मारुन बसचे अंदाजे २५,०००/—रु. चे नुकसान केल्याने फिर्यादी मनोहर अन्नाजी टिचकुले वय ४० वर्ष, रा. जामगाव यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम २७९ भांदवि. सहकलम १८५ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सतदेवे पो.स्टे अडयाळ हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**४) ट्रॅक्टर चालकाने एसटी बसला धडक मारुन एसटी बसचे नुकसान केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०५/१०/२०१७ चे १०.३५ वाजता दरम्यान यातील फिर्यादी साधीक सिंकदर शेख वय ५२ वर्ष, रा. दवडीपार बाजार हा आपल्या ताब्यातील एसटी बस क्र. एमएच ४०/८७४४ ही भंडारा वरुन खडेकी येथे रोडने चालवित जात असता समोरुन येणाऱ्या यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील ट्रॅक्टर भरधाव वेगाने, लापरवाहीने चालवुन फिर्यादीचे बसला मागेहुन धडक मारल्याने मागील भाग चेपकुन नुकसान केल्याने व अपघाताची माहिती न देता पळुन गेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २७९ भांदवि. सहकलम १३४, १८७, १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोवा. मनगटे पो.स्टे कारधा हे करीत आहेत.

**५) अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन थापड बुक्यांनी मारहान करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक ०५/१०/२०१७ चे १८.०० वाजता दरम्यान यातील तिन्ही आरोपी हे फिर्यादीचे घरावर आले व फिर्यादी व तीचे पतीला आवाज देवुन 'तुम्ही माझ्या मुला सोबत आपल्या पुतणीला पडवीले' असे म्हणुन आरोपी क्र. १ ने फिर्यादीचे डोक्याचे केस ओढुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिली व आरोपी क्र. २ व ३ यांनी थापड बुक्यांनी मारहाण केल्याने फिर्यादींचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम २९४,५०६,३२३,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. परतेकी पो.स्टे आंधळगाव हे करीत आहेत.

**६) तलावाचे पाण्यात बुडुन इसमाचा मृत्यु. :–**

दिनांक ०५/१०/२०१७ चे १२.०० वाजता दरम्यान यातील मृतक मदनगोपाल नारायण करंजेकर वय ४८ वर्ष, रा. दिघोरी हा घरच्या ४ म्हशी वगारी व २ बैल चारण्यास आज सकाळी १०.०० वा. घरुन गेला होता दिघोरी बांध तलावामधुन म्हशी पाण्याचे बाहेर काढत असतांनी मृतक हा अचानक खोल पाण्यात जावुन पाण्यात बुडुन मरण पावल्याने फिर्यादी दिपक मदनगोपाल करंजेकर वय २० वर्ष रा. दिघोरी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. तलमले पो.स्टे दिघोरी हे करीत आहेत.

**७) अचानक इसमाचा मृत्यु. :–**

दिनांक ०४/१०/२०१७ चे ०७.५० वाजता दरम्यान यातील मृतक तुषार आनंदराव दुबे वय ३५ वर्ष, रा. खात यास दिनांक ०४/१०/२०१७ ला मृत अवस्थेत सामान्य रुग्णालय भंडारा येथे आनले असता तेथील डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केल्याने डॉक्टरी मेमो वरुन व मृतक च्या भावाचे बयाना वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. कन्नाके पो.स्टे भंडारा हे करीत आहेत.

**८) तलावाचे पाण्यात बुडुन इसमाचा मृत्यु . :–**

दिनांक ०५/१०/२०१७ चे ११.०० वाजता ते १५.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी नामदेव रावण वाघमारे वय ४५ वर्ष, रा. माहुली जि. गोदिंया याचा वडील मृतक श्रावण भटु वाघमारे वय ६० वर्ष, रा. माहुली याला पोटाचे बिमारीचा त्रास असल्याने डॉक्टरी बोधकर रा. विरसी येथे उपचारा करीता नेले परंतु डॉक्टर बोधनकर हे हजर न मिळुन आल्याने फिर्यादीचा वडील मृतक हा संडास कडे जातो म्हणुन विरसी गावाचे तलावात गेला असता तिथे त्याची प्रकृती बिघडल्याने तलावाचे पाण्यात पडुन बुडुन मरण पावल्याने फिर्यादी दिपक मदनगोपाल करंजेकर वय २० वर्ष रा. दिघोरी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. पाटील पो.स्टे साकोली हे करीत आहेत

**९) अवैध दारू/जुगार अडयावर धाडी . :–**

दिनांक ०५/१०/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन अडयाळ व गोबरवाही येथे अवैध दारू/ जुगार अडयावर धाडी घालुन एकुण ०२ गुन्हे दाखल करून २७० मिली लिटर देशी दारू किंमती ९०/–रु, तसेच जुगारातुन किंमती २५,२५०/–रु. असा एकुण किंमती २५,३४०/–रु. चा माल जप्त करण्यात आला.

**१०) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक ०५/१०/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ११८ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०३, तीन सिटर वाहनांवरती १३ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती १०२ केसेस करण्यात आले आहे.

06.10

**(एस. व्ही. कुलकर्णी )**
**पोलीस उपअधिक्षक (गृह)**
**भंडारा**
**दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५**

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता